परीक्षण

ज्युली-असंभवः सेक्सचा विजय, हिंसेची हार

ज्युली आणि *असंभव* या दोन सिनेमांविषयी आपण एकाच वेळी या बोलू या. खरं सांगायचं तर दोन्ही चित्रपटांचे विषय फारच उथळ आहेत. *ज्युली*मध्ये सेक्सचा अतिरेक आहे. त्यात दिग्दर्शकाला विषयाची खोली गाठता आलेली नाही. *असंभव*मध्ये चरसशी संबंधित हिंसा दाखवली आहे, पण पाकिस्तानच्या नावाने शिमगा करण्यापलिकडे आणि भडक संवादांपलिकडे यांत दुसरं काहीच दिसत नाही. प्रेक्षकांना आता याचा कंटाळा येऊ लागलाय, हे कोणीच कसं लक्षात घेत नाही?

*ज्युली*मध्ये नेहा आणि प्रियांशुमधे केमिस्ट्री जुळत नाही. दोघंही निर्जिव पुतळे वाटतात. दोघांनाही अजून अभिनयाचे बरेच धडे गिरवण्याची गरज आहे. *असंभव*मध्ये अभिनयाचा बादशहा समजला जाणारा नसीरुद्दीन आपल्या भूमिकेत रंग भरण्याचा प्रयत्न करताना दिसतो. तसंच हिरो अर्जुन रामपालचाही अभिनय वाखाणण्याजोगा आहे. तरीसुद्धा सिनेमात काही दम नाही असं खेदाने म्हणावं लागेल. कारण याची कथा-पटकथाच दमदार नाही. अर्थात हे आमचं मत झालं, पण प्रेक्षकांच्या प्रतिसादाचं म्हणाल तर *ज्युली*ला बॉक्स ऑफीसवर बंपर ओपनिंग मिळालंय तर दुसरीकडे *असंभव*ची प्रेक्षकांनी अजिबात दाखल घेतलेली नाही. ★

दखल

कृणालच्या भक्तीरसपर सीडीज






अधिक महिन्याच्या निमित्ताने कृणाल म्युझिकने भक्तीगीतांच्या वेगवेगळ्या व्हीसीडीज आणि एमपीथ्री सीडीज बाजारात आणल्या आहेत. *३३ नॉन स्टॉप मोठा महादेव*, *३३ नॉन स्टॉप मार्लेश्वर* आणि *३३ नॉन स्टॉप भिमाशंकर* अशा तीन शंकराच्या गाण्यांच्या व्हीसीडीजचा समावेश आहे. यात शंकराच्या पारंपरिक गीतांबरोबरच नव्या गाण्यांचं आणि नयनरम्य लोकेशन्सचं आकर्षण आहे.

तसंच *पाऊले चालती पंढरीची वाट* ही ७५ लोकप्रिय भक्तीगीतांची एमपी३ सीडी कृणालच्या वतीने उपलब्ध करण्यात आली आहे. या सीडीजमधल्या गाण्यांना विजय सरतापे, शकुंतला जाधव यांनी आवाज दिला असून अरुण कचरेंच्या गीतांना अशोक वायंगणकर यांनी संगीत दिलंय. व्ही सीडीजसाठी माया जाधव आणि संतोष भांगरे यांनी नृत्य दिग्दर्शन केलंय.

बक्षीजींनीच मला अमर केलंय - राजेश खन्ना



आपल्या गीतांमधून जगण्याचं रहस्य सांगणाऱ्या आनंद बक्षींनी लिहिलेली कितीतरी गाणी मी पडद्यावर सादर केली. आज ती गाणीच माझी ओळख बनून राहिली आहेत. उदाहरणार्थः-

१. 'कुछ तो लोग कहेंगे लोगों का काम है कहना छोडो बेकार की बातो में कहीं बीत न जाये रैना...' - *अमर प्रेम*
२. 'चिंगारी कोई भडके तो सावन उसे बुझाये सावन जो अगन लगाये उसे कौन बुझाये...' - *अमर प्रेम*
३. 'जिस गली में तेरा घर न हो बालमा उस गली से हमें तो गुजरना नहीं...' - *कटी पतंग*
४. 'प्यार दीवाना होता है मस्ताना होता है हर खुशी से हर गम से बेगाना होता है...' - *कटी पतंग*
५. 'कोरा कागज था ये मन मेरा लिख दिया नाम उस पे तेरा...' - *आराधना*
६. 'मेरे सपनों की रानी कब आयेगी तू आयी रूत मस्तानी कब आयेगी तू...' - *आराधना*
७. 'खिजां के फूल पे आती कभी बहार नहीं मेरे नसीब में अय दोस्त तेरा प्यार नहीं...' - *दो रास्ते*
८. 'वादा तेरा वादा...' - *दुश्मन*
९. 'रोना कभी नहीं रोना चाहे टूट जाये कोई खिलौना...' - *अपना देश*
१०. 'मैं शायर बदनाम महफिल को नाकाम...' - *नमक हराम*
११. 'नदिया से दरिया दरिया से सागर...' - *नमक हराम*
१२. 'जब दर्द नहीं था सीने में तब खाक मजा था जीने में...' - *अनुरोध*
१३. 'इक अजनबी हसीना से यू मुलाकात हो गई फिर क्या हुआ ये न पूछो कुछ ऐसी बात हो गई...' - *अजनबी*
१४. 'मेरे नयनां सावन भादों फिर भी मेरा मन प्यासा...' - *महबूबा*
१५. 'ये लाल रंग कब मुझे छोडेगा तेरा गम कब तलक मेरा दिल तोडेगा...' - *प्रेमनगर*
१६. 'नाच मेरी बुलबुल कि पैसा मिलेगा कहां कदरदान तुम्हें ऐसा मिलेगा...' - *रोटी*
१७. 'गोरे रंग पे न इतना गुमान कर गोरा रंग दो दिन में ढल जायेगा...' - *रोटी*
१८. 'दिल में आग लगाये सावन का महिना नहीं जीना नहीं जीना तेरे बिन नहीं जीना...' - *अलग अलग*

आपल्या गीतांमधून बक्षीजींनी माझीच जीवनगाथा सांगितली आहे असं वाटतं ना? बक्षीजी, तुमच्यामुळे मीही अमर झालोय.

□ राजेश खन्ना ★